# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 21/01/2024 (रविवार) दुपार

---

### घरफोडी

**पोलीस स्टेशन रामटेक**:— अंतर्गत 02 किमी अंतरावर अंबाळा वार्ड, बीएसएनएल कॉटरच्या मागे रामटेक येथे दि. २०/०१/२०२४ चे २०.०० वा. ते २१.४० वा. फिर्यादी नामे— कुणाल मारोती कावळे वय २७ वर्ष रा. अंबाळा वार्ड, बीएसएनएल कॉटरच्या मागे रामटेक यांनी पो.स्टे.रामटेक येथे हजर येवुन तोंडी रिपोर्ट दिली कि, फिर्यादीचे घराचे कुलुप तोडून घरात असलेल्या टिन व लोखंडी कपाटाच्या आतील लॉकरमध्ये ठेवलेले नगदी १०,०००/—रू, १५ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसुत्र किमती ६०,००० रू. व पर्समधील एटीएम व इतर कागदपत्रे असा एकुण ७०,०००/रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. असे फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे रामटेक येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहे.

### नागपूर ग्रामीण जिल्हयात नरखेड मध्ये रूटमार्च

पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत आगामी काळातील धार्मिक उत्सव तसेच मराठा समाज आंदोलना दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी या दृष्टिकोनातून आज दिनांक २१/०१/२०२४ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल श्री. रोहोम सर यांच्या मार्गदर्शनात सावरगाव येथील शोभायात्रा मिरवणूक मार्गावर पोलीस ठाणे नरखेड येथील अधिकारी आणि अंमलदार, RCP पथक आणि होमगार्ड सैनिक यांच्या सह रूट मार्च घेण्यात आला. तसेच बस स्टँड चौक सावरगाव येथे जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.

तसेच पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत दुरक्षेत्र सावरगाव येथे मा. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल यांच्या मार्गदर्शनाखाली सावरगाव येथील मौलाना व मुस्लिम बांधव यांच्यासोबत चर्चा करून उद्या होणाऱ्या श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम दरम्यान शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तदनंतर शोभायात्रेचे आयोजक यांच्या सोबत बैठक घेऊन कार्यक्रमा दरम्यान शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या निर्देशनाचे तंतोतंत पालन करण्याबाबत तसेच पोलीस प्रशासनास वेळोवेळी सहकार्य करण्याबाबत सूचना दिल्या. सदर कार्यक्रमादरम्यान डीजे साऊंड चा वापर केला जाणार नाही दुसऱ्या धर्माच्या विरोधात नारेबाजी घोषणाबाजी करू नये याबाबत सूचना दिल्या. सामाजिक माध्यमातून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही आक्षेपार्ह पोस्ट तथा मजकूर प्रसारित केला जाणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना दिल्या.

पोलीस स्टेशन काटोल येथे आज दिनांक २१/०१/२०२४ रोजी मा. बापू रोहम उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन काटोल येथील ४ अधिकारी तसेच २० कर्मचारी, पोलीस मुख्यालयातील आरसीपी पथक व २७ होमगार्ड पथक यांच्यासह काटोल शहर मध्ये राम मंदिर परिसर हत्तीखाना मस्जिद परिसर शनि चौक आंबेडकर चौक बाजार चौक रूट मार्ग घेण्यात आला व आंबेडकर चौक मध्ये प्रात्यक्षिक

करण्यात आले. रूट मार्च १२/१० ला सुरू करण्यात आले व पोलीस स्टेशन १३.४० ला रूट मार्च समाप्त करण्यात आला



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर